SAMPLE CONTENT

PERFECT

# मराठी युवकभारती

पाठ्यपुस्तक व बोर्डाच्या कृतिपत्रिका आराखड्यावर आधारित



सावली म्हात्रे
M.A., D.T.Ed.

इयत्ता
अकरावी

Target Publications® Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
यांच्याद्वारे निर्धारित पाठ्यपुस्तकावर आधारित.

PERFECT

# मराठी युवकभारती

## इयत्ता अकरावी

### ठळक वैशिष्ट्ये

- इयत्ता १२ वी च्या अद्ययावत कृतिपत्रिका आराखड्यावर आधारित
- पाठांचे परिच्छेदांमध्ये विभाजन
- आदर्श उत्तरांसहित सरावासाठी भरपूर कृती
- पाठाखालील सर्व प्रश्नांचा समर्पक उत्तरांसहित समावेश
- प्रत्येक कवितेच्या रसग्रहण कृतीचा अंतर्भाव
- उपयोजित लेखनावर आधारित वैविध्यपूर्ण कृतींचा अंतर्भाव
- सखोल अभ्यासासाठी स्वतंत्र व्याकरण विभाग अंतर्भूत
- स्वयंअध्ययनासाठी परिपूर्ण मार्गदर्शक

Sample Content

Printed at: **India Printing Works,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2018MH0022

**TEID: 3817**

P.O. No. 13643

# प्रस्तावना

नमस्कार, विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो!

तुमचे महाविद्यालयीन जीवनातील हे पहिले वर्ष. मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकात पारंपरिक अभ्यासपद्धतीला नवे वळण देत, भाषिक कौशल्यांचा विकास व विविध व्यावसायिक संधींचा परिचय करून देण्याचा स्तुत्य प्रयत्न शिक्षण मंडळाने केला आहे. विविध साहित्यप्रकार तसेच नव्या-जुन्या साहित्यिकांच्या लेखनशैलींचा परिचय करून देणारे, ज्ञानरचनावादावर आधारित असे हे नवीन पाठ्यपुस्तक भाषेची आवड व उंची वाढवणारे आहे. यामुळे, भाषाज्ञान केवळ प्रश्नोत्तरांपुरते मर्यादित न राहता आकलनशक्ती व सर्जनशीलता या क्षमतांचा विकास करणारे ठरेल. या पाठ्यपुस्तकाचे सूक्ष्म विश्लेषण करून इयत्ता बारावीच्या अद्ययावत कृतिपत्रिका आराखड्यानुसार तयार करण्यात आलेले टार्गेट प्रकाशनाचे **PERFECT मराठी युवकभारती : इयत्ता अकरावी** हे पुस्तक प्रकाशित करताना आम्हांला आनंद होत आहे.

इयत्ता बारावीच्या अद्ययावत कृतिपत्रिका प्रारूपाला आधारभूत मानून या पुस्तकाची निर्मिती केली आहे. बारावीच्या अद्ययावत कृतिपत्रिका प्रारूपाचा विद्यार्थ्यांना परिचय व्हावा व त्या दृष्टीने अध्ययन करणे सोपे व्हावे हा यामागील मूळ उद्देश आहे. विद्यार्थ्यांमध्ये श्रवण, भाषण, वाचन आणि लेखन यांसारखी भाषिक कौशल्ये विकसित करणे तसेच वैचारिकता व कल्पनाशक्ती विकसित करणे ही या पुस्तकाची उद्दिष्टे आहेत. पाठाच्या मांडणीच्या क्रमानुसार कृतींची मांडणी हे आमच्या प्रकाशनाच्या पुस्तकांचे वेगळेपण आहे. पुस्तकाची सहज, सुलभ, सोपी भाषा ही मुलांना भाषेत जाणवणारी क्लिष्टता दूर करून त्यांच्यामध्ये विषयाची आवड निर्माण करण्यास सक्षम आहे.

परीक्षेच्या दृष्टिकोनातून विचार करता अधिकाधिक सरावासाठी मुबलक कृतींची सोप्या शब्दांत रचना केली आहे. व्याकरण हा भाषेचा आत्मा असतो हे जाणून व्याकरणाच्या सरावावर अधिकाधिक भर देण्यात आला आहे. यामुळे, विद्यार्थ्यांना व्याकरणावर पर्यायाने भाषेवर प्रभुत्व मिळवणे सोपे होईल. हे पुस्तक मुलांची परीक्षेच्या दृष्टीने प्रत्येक गरज भागवण्यास समर्थ आहेच शिवाय ते विद्यार्थ्यांमध्ये भाषेकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन निर्माण करणारेही आहे.

या पुस्तकाचे अंतरंग अधिक सुंदर आणि ज्ञानाशयाने समृद्ध असून एका दृष्टिक्षेपात ते जाणता यावे याकरिता पुस्तकाची ठळक वैशिष्ट्ये पुढे देण्यात आली आहेत.

या पुस्तकात प्रत्येक अभ्यासघटकाचा सर्वांगाने परामर्श घेतला आहे. तेव्हा विद्यार्थ्यांसाठी हे पुस्तक एक परिपूर्ण मार्गदर्शक ठरेल अशी आम्हांला खात्री वाटते. भरपूर सराव, सुटसुटीत मांडणी, आत्मसात करण्यास सोपी व ओघवती लेखनशैली यांमुळे हे पुस्तक तुमच्या पसंतीस उतरेल असा आम्हांला विश्वास आहे.

प्रयत्नांती परमेश्वर. चला, नियोजनबद्ध अभ्यासाला सुरुवात करूया. परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जाऊया. तुमच्या प्रयत्नांत आम्ही सदैव तुमच्या सोबत आहोत.

**धन्यवाद!**

**ज्ञानार्थींना मन:पूर्वक शुभेच्छा!**

**प्रकाशक**

**आवृत्ती :** तृतीय

हे पुस्तक परिपूर्ण करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत, तरी पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत. याकरिता आपला अभिप्राय **mail@targetpublications.org** या इ-मेल पत्त्यावर पाठवावा ही नम्र विनंती.

**Disclaimer**

This reference book is transformative work based on 'मराठी युवकभारती' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

Sample Content

# वैशिष्ट्ये

**कवितेचा भावार्थ**

For greater clarity the paraphrase of the complete poem has been provided in simple and lucid language.

**शब्दार्थ / वाक्प्रचार / टिपा व त्यांचे अर्थ**

A Glossary containing the meanings of all the difficult words, phrases and some difficult concepts from the chapter has been provided. For the convenience of the students these words have been arranged alphabetically.

**रसग्रहण**

This section includes the Appreciation of Poem of all the lines of each poem. This will help the students in learning and writing the critical appreciation of the poem.

**व्याकरण**

For ensuring ample practice, we have provided this special section at the end of each chapter, which extensively covers all the language study and grammar activities.

**अपठित गद्य आकलन**

A separate section with plenty of Unseen passages along with activities based on them has been provided to ensure substantial practice.

**उपयोजित लेखन**

This section towards the end of the book includes all the writing skills activities prescribed for the students, with the explanation of concepts in lucid language. It contains chapters on 'सूत्रसंचालन, मुद्रितशोधन, अनुवाद, अनुदिनी (ब्लॉग) लेखन, रेडिओजॉकी'.

**स्वतंत्र व्याकरण विभाग व निबंधलेखन**

For thorough understanding of grammar a dedicated section on Grammar has been provided. This section covers explanation of the concepts and ample examples with practice questions including essay writing guidelines along with solved essays to aid students.

Sample Content

# अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे / कवितेचे नाव | लेखक / लेखिका / कवी / कवयित्री | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | **भाग – १** | | |
| | स्वतंत्रतेचें स्तोत्र (काव्यानंद) | स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर | १ |
| १. | मामू | शिवाजी सावंत | ३ |
| २. | प्राणसई (कविता) | इंदिरा संत | १५ |
| ३. | अशी पुस्तकं | डॉ. निर्मलकुमार फडकुले | २५ |
| ४. | झाडांच्या मनात जाऊ (कविता) | नलेश पाटील | ३८ |
| ५. | परिमळ | प्रल्हाद केशव अत्रे | ४५ |
| ६. | दवांत आलिस भल्या पहाटीं (कविता) | बा.सी.मर्ढेकर | ६० |
| | **भाग – २** | | |
| ७. | ‘माणूस’ बांधूया! | प्रवीण दवणे | ६७ |
| ८. | ऐसीं अक्षरें रसिकें (संतकाव्य) | संत ज्ञानेश्वर | ७६ |
| ९. | वहिनींचा ‘सुसाट’ सल्ला | शोभा बोंद्रे | ८३ |
| १०. | शब्द (कविता) | यशवंत मनोहर | १०० |
| ११. | वाङ्मयीन लेण्याचा शिल्पकार | सुमती देवस्थळे | १०७ |
| १२. | पैंजण (कविता) | नीलम माणगावे | १२० |
| • | **अपठित गद्य उतारे** | | १२९ |
| | **भाग – ३** | | |
| • | नाटक – साहित्यप्रकार-परिचय | | १३६ |
| १. | हसवाफसवी | दिलीप प्रभावळकर | १४९ |
| २. | ध्यानीमनी | प्रशांत दळवी | १५६ |
| ३. | सुंदर मी होणार | पु.ल.देशपांडे | १६२ |
| | **भाग – ४ उपयोजित लेखन** | | |
| १. | सूत्रसंचालन | | १६७ |
| २. | मुद्रितशोधन | | १७२ |
| ३. | अनुवाद | | १७९ |
| ४. | अनुदिनी (ब्लॉग) लेखन | | १८७ |
| ५. | रेडिओजॉकी | | १९४ |


Sample Content

| भाग – ५ व्याकरण व लेखन | | | |
|---|---|---|---|
| १. | शब्दसिद्धी | | २०१ |
| २. | शब्दशक्ती | | |
| ३. | काव्यगुण | | |
| ४. | वाक्यसंश्लेषण | | |
| ५. | काळ | | |
| ६. | शब्दभेद | | |
| ७. | शब्दसमूहाबद्दल एक शब्द | | |
| ८. | आलंकारिक शब्द | | |
| ९. | लेखननियम | | |
| १०. | विरामचिन्हे | | |
| ११. | म्हणी | | |
| १२. | कवितेचे रसग्रहण | | |
| • | **निबंधलेखन** | | २४० |
| • | **साहित्यिकांची टोपण नावे, रचना, पुरस्कार** | | २४९ |


**टीप :** पाठाखाली दिलेले प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.

Sample Content

Sample Content

भाग - १

# स्वतंत्रतेचें स्तोत्र (काव्यानंद)

– स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर

## कवितेचा आशय

प्रस्तुत देशभक्तिपर रचनेत कवी वि. दा. सावरकर यांनी स्वातंत्र्यदेवतेचे स्तोत्र गायले आहे. स्वातंत्र्य हेच राष्ट्राचे चैतन्य आहे, श्वास आहे. तेच शुभ, कल्याणकारी, मोक्षमुक्तिस्वरूप आहे. (१९०३ साली रचलेली ही काव्यरचना स्फूर्तीगीत या गीतप्रकारात मोडते.)

## कवितेतून मिळणारा संदेश

राष्ट्राच्या स्वातंत्र्याकरिता जगणे-मरणे हेच सर्व देशवासियांच्या जीवनाचे इतिकर्तव्य आहे. हे कर्तव्य प्राणपणाने पाळून आपली प्रत्येक कृती राष्ट्रहिताकरिता समर्पित करावी, मातृभूमीच्या स्वातंत्र्याकरिता आत्मसमर्पण करावे हा संदेश कवी या कवितेतून देतात.

## कवितेचा भावार्थ

**'जयोऽस्तु ते .................... यशोयुतां वंदे ।।धृ.।।'**

स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणतात, हे स्वातंत्र्यदेवते, वैभवसंपन्न, महान, मंगलदायिनी, कल्याणकारी माते, कीर्तिमान असलेल्या तुला मी वंदन करतो.

**'राष्ट्राचें चैतन्य ................................ त्यांची'**

हे स्वतंत्रता देवी, तूच राष्ट्राचे चैतन्य आहेस, श्वास आहेस. तू सदाचाराची, संपन्नतेची मूर्ती आहेस. या गुणवैभवाची व संपन्नतेची तू राणी आहेस.

**'परवशतेच्या नभांत तूंची .................. लखलखशी'**

या पारतंत्र्याच्या, गुलामगिरीच्या मिट्ट काळोख्या अंधारात हे स्वातंत्र्यलक्ष्मी, तूच चमचम लखलखणारी तेजस्वी चांदणी आहेस. (म्हणजेच, तूच या अंधारात आम्हांला मार्ग दाखवणारी तेज:पुंज तारका आहेस.)

**'गालावरच्या ................................ लाली'**

येथील लोकांच्या फुलांसारख्या सुकुमार गालांवर आणि येथील फुलांवर जी लाली शोभून दिसत आहे, ती तुझीच आहे.

**'तू सूर्याचें ............................. नष्ट तेंची।'**

सूर्याचे तेजही तूच, सागराची गंभीरताही तूच आहेस. तुझ्याविना सूर्याच्या तेजाला, सागराच्या गंभीरतेलाही ग्रहण लागेल, म्हणजेच तुझ्याशिवाय त्यांना काही किंमतच उरणार नाही.

**'मोक्ष मुक्ति ................................... वदती'**

मोक्ष, मुक्ती ही तुझीच रूपे आहेत, तुला वेदांती, योगिजन 'परब्रह्म' म्हणतात.

**'जें जें उत्तम ......................... सहचारी होतें।'**

या जगात/विश्वात जे जे चित्ताकर्षक, उत्तम, श्रेष्ठ, उच्च, उदार, प्रगतिशील, महान आहे ते सर्व तुझेच सहचारी, सांगाती, सोबती आहेत.

**'हे अधम .................................... शरण।'**

अधम, पापी, नीच शत्रूंच्या रक्ताने न्हालेल्या, चांगल्या, सत्प्रवृत्तीच्या लोकांच्या पूजनाने पवित्र झालेल्या हे स्वातंत्र्यदेवते, तुझ्यासाठी आलेल्या मरणातही मी धन्यता मानेन. तुझ्याशिवाय जगणे म्हणजे मरण समजेन. संपूर्ण विश्व मी तुझ्या पायाशी आणून ठेवेन.

**'भरतभूमिला दृढालिंगना कधिं ................... वंदे।'**

हे वर देणाऱ्या देवते, तू माझ्या मातृभूमीला कधी बरे जवळ घेशील? तिला तुझा सहवास कधी बरे लाभेल?
हे स्वातंत्र्यदेवते, कीर्तिमान असलेल्या तुला मी वंदन करतो.

## शब्दार्थ

| | |
|---|---|
| अधम | नीच, पापी (ill-natured) |
| अन्यथा | (or, otherwise) |
| उत्तम | उत्कृष्ट (best, elite, excellent) |
| उदधि | समुद्र (sea) |
| उदात्त | श्रेष्ठ (magnificent) |
| उन्नत | उच्च, श्रेष्ठ (highest) |
| कुसुम | फूल, सुमन (flower) |
| गांभीर्य | गंभीरता |
| चराचर | संपूर्ण विश्व (all creation, world) |
| चांदणी | तारका (star) |
| चैतन्य | जिवंतपणा (liveliness) |
| जनन | जन्मणे (to born) |
| जयोऽस्तु | विजय असो (victory to you) |
| तेज | (radiance) |
| त्वामहं (त्वाम् + अहम्) | तुला मी |

Sample Content

| | |
|---|---|
| दृढालिंगना | घट्ट मिठीत घेणे (clasp, embrace tightly) |
| नभ | आकाश, आभाळ (sky) |
| नष्ट | नाहीसे होणे, नाश पावणे (ruin) |
| नीती | सदाचारी वृत्ती, मूल्य (virtues, morality) |
| पद | पाय, चरण (feet) |
| परब्रह्म | (supreme soul) |
| परवशता | गुलामगिरी (slavery) |
| पूजिते | वंदन करणारी, पूजन करणारी |
| भगवती | देवी (goddess) |
| मधुर | येथे अर्थ – चित्ताकर्षक, मन आकर्षून घेणारे (attractive) |
| मूर्त | मूर्ती, पुतळा (statue) |
| मोक्ष, मुक्ती | (liberation) |
| यशोयुतां | यशस्वी, कीर्तिमान (victorious) |
| युत | जोडलेले, युक्त (attached) |
| रक्तरंजित | रक्तबंबाळ (bloodbath) |
| राज्ञी | राणी (queen) |
| लखलखशी | चमकणे (to gleam, to shine) |
| लाली | गालावरची लालसर छटा (blush) |
| वरदे | आशीर्वाद, वर देणारी (giver of boons) |
| विलसतसे | शोभून दिसणे |
| वेदांती | ब्रह्मज्ञानी (yogi) |
| शरण | अधीन होणे (surrender) |
| शिवास्पदे | कल्याणकारी (holy abode) |
| शुभदे | शुभकारी (auspicious) |
| श्रीमती | ऐश्वर्यसंपन्न, वैभवसंपन्न (enriching) |
| श्रीमहन्मंगले | वैभवसंपन्न, महान, मंगलदायिनी |
| सकल | सर्व (all) |
| सहचारी | सोबती (companion) |
| सुजन | चांगले लोक (noble person) |
| संपदा | समृद्धी, वैभव (prosperity) |

[टीप : प्रस्तुत कविता ही केवळ काव्यानंदाकरिता देण्यात आली असून तिच्यावर आधारित कोणत्याही प्रकारची कृती परीक्षेत विचारली जाणार नाही. व्याकरणाच्या अधिक सरावाकरिता त्यावर आधारित काही कृती देण्यात आल्या आहेत.]

## व्याकरण

**१. खालील शब्दांच्या आधी योग्य तो उपसर्ग लावून कंसात दिलेल्या अर्थाचा अर्थपूर्ण शब्द तयार करा.**

i. _______ + हार = ☐ (भोजन)
ii. _______ + हार = ☐ (नाश)
iii. _______ + हार = ☐ (घाव)

**उत्तर :** i. आहार ii. संहार iii. प्रहार

**२. 'पर' हा उपसर्ग वापरून शब्द तयार करा.**

**उत्तर :** परदेश, परभाषा, परगाव, परकाया.

**३. खालील वैशिष्ट्यांवरून शब्दशक्ती ओळखा.**

i. शब्दाचा अर्थ शब्दकोशात असतो. ☐
ii. मूळ अर्थाला बाधा न येता वेगळा अर्थ सूचित होतो. ☐
iii. मूळ अर्थ उपयुक्त न ठरता संदर्भाने जुळलेला दुसरा अर्थ गृहीत धरावा लागतो. ☐

**उत्तर :** i. अभिधा शक्ती ii. व्यंजना शक्ती iii. लक्षणा शक्ती

**४. खालील ओळींतील काव्यगुण ओळखा.**

i. हे अधम – रक्त – रंजिते।
ii. गडद निळे गडद निळे जलद भरुनि आले।

**उत्तर :** i. ओज गुण ii. माधुर्य गुण

**५. खालील वाक्यांचे प्रकार ओळखून लिहा. (केवल वाक्य, मिश्र वाक्य, संयुक्त वाक्य)**

i. झटून अभ्यास केला, की यश हमखास मिळतेच.
ii. मी पावसात भिजलो आणि मला ताप आला.

**उत्तर :** i. मिश्र वाक्य ii. संयुक्त वाक्य

**६. कंसातील सूचनेनुसार बदल करा.**

i. तो सायकल चालवतो. **(रीति भूतकाळ करा.)**
ii. मला कायम नाचायला आवडेल. **(रीति भविष्यकाळ करा.)**

**उत्तर :**
i. तो सायकल चालवत असे.
ii. मला कायम नाचायला आवडत राहील.

**७. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

i. शुभ × ii. निती ×

**उत्तर :** i. अशुभ ii. अनिती

Sample Content

# १ मामू

– शिवाजी सावंत

## पाठाची पार्श्वभूमी

प्रस्तुत पाठ हा 'लाल माती रंगीत मने' या व्यक्तिचित्रण संग्रहातून घेण्यात आला आहे. 'मामू' हा व्यक्तिचित्रणात्मक पाठ असून त्यातून सर्वसामान्य असलेल्या; मात्र तरीही जीवनाचा असामान्य आनंद लुटणाऱ्या 'मामू' च्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडले आहेत. प्रामाणिकपणा, देशाभिमान, नम्रता, सेवाभावी वृत्ती या साऱ्या गुणांनी समृद्ध असलेला सहृदयी मामू 'माणुसकीचे' मूर्तिमंत उदाहरण असल्याचे पाठातून जाणवते. चित्रदर्शी लेखनशैली आणि प्रसंगानुरूप समर्पक अशी शब्दरचना यांमुळे उभे राहिलेले 'मामू' हे व्यक्तिमत्त्व मनाचा ठाव घेतल्याशिवाय राहत नाही.

## शब्दार्थ

| | |
|---|---|
| अगणित | असंख्य (countless) |
| अनघड | न घडवलेले (undeveloped) |
| अनोशा पोटी | रिकाम्या पोटी (empty stomach) |
| अल्लाची खैर | अल्लाची कृपा (blessing of god) |
| अवाढव्य | आकाराने प्रचंड मोठे (gigantic) |
| अज्ञात | ज्ञात नसलेले (unknown) |
| आखणी | येथे अर्थ - व्यवस्थापन आराखडा तयार करणे (plan/arrangement) |
| आघाडी | पहिले स्थान (lead/ forefront) |
| आब | प्रतिष्ठा, डौल (prestige) |
| आमदार | विधानसभेचा सदस्य (member of legislative assembly) |
| आळवणे | विनवणे (entreaty) |
| अंगधरीसारकं | अंगाला लागेल असे, बाळसं धरेल असे (nourishing) |
| इमानी | प्रामाणिक (faithful) |
| इशारतीबरहुकूम | केवळ इशाऱ्यावरून, खुणेवरून (according to signal, sign) |
| उमदं | थोर, शूर, येथे अर्थ - तरुण (young) |
| ऊर | छाती (chest) |
| कर्तबगारी | शौर्य (bravery) |
| कवळिकी | येथे अर्थ -कोवळीक (not fully matured) |
| काढा | औषधी वनस्पती उकळून तयार केलेले पेय (extract) |

| | |
|---|---|
| कारकीर्द | राजवटीचा काळ, अंमलाचा काळ (period of ruling/ reign/ tenure) |
| कुरवाळणे | मायेने हात फिरवणे, गोंजारणे (caress) |
| कैक | कित्येक (many) |
| कोंब | अंकुर (sprout) |
| खासदार | संसदेचा सदस्य (member of parliament) |
| खुलणे | प्रसन्न होणे, लकाकी येणे (brighten) |
| घटका | येथे अर्थ - थोडा वेळ (for some times) |
| घेर | फेर, वेढा (loop) |
| घोटा | पायाचा एक भाग (ankle) |
| चण | ठेवण, बांधा (physique) |
| चर्या | मुद्रा, चेहरा (face) |
| चाकर | नोकर (servant) |
| चुनेवाणाची | चुन्यासारखी/चुन्याच्या निवळीसारखी पांढरी (alike lime-water) |
| चैतन्य | जिवंतपणा, रसरसलेले जीवन (liveliness) |
| झालर | नक्षीदार किनार (frill) |
| डुईला | डोक्याला (on head) |
| ढब | शैली (manner, style) |
| तरळणे | झळकणे (float) |
| तुमान | लांब व पोकळ विजार (long & loose pant) |
| थोराड | वयामुळे प्राप्त झालेला मोठेपणा, येथे अर्थ - पुरातन, दणकट, बळकट (ancient) |
| निकोप | निर्मळ, येथे अर्थ - ऐटीत (gracefully) |
| पदवीधर | पदवी मिळवलेला (graduate) |
| पाखरागत | पक्ष्याप्रमाणे (alike birds) |
| पारखणे | तपासणी करणे (to inspect) |
| पोरवयाचा | कमी वयाचा (boyhood) |
| पंपशू | वहाणांचा एक प्रकार (type of footwear) |
| पांगणे | इकडे तिकडे पसरणे (to spreadout) |
| फाट | येथे अर्थ - पहाट (dawn) |
| फेटा | पटका, लहान पागोटे (turban) |
| बैठकीची व्यवस्था | बसण्यासाठी केलेली सोय (seating arrangement) |

Sample Content

| | |
|---|---|
| भिडवणे | गच्च धरणे (tightly hold) |
| माज | घमंड, गर्व, अहंभाव (arrogance) |
| माणुसकी | मानवता (humanity) |
| माजी | होऊन गेलेला, एकेकाळचा (ex,former) |
| मासला | उदाहरण, नमुना (example) |
| मुखडा | चेहरा (face) |
| मैल | अंतराचे एक माप (५,२८० फूट = १ मैल) (unit of distance) (5,280 foot = 1 mile) |
| मौलवी | मुस्लिम धर्म उपदेशक (Maulavee) |
| रजिस्टर | नोंदवही (register) |
| रेलणे | झुकणे, कलणे (bend) |
| रेंगाळणे | घुटमळणे (linger) |
| वैद्यक | औषधशास्त्र (medical science) |
| व्हरांडा | पडवी (veranda) |
| शादी मुबारक | मुस्लिम घराण्यातील लग्नाचा सोहळा (muslim weddings ceremony) |
| शेर | एक जुने माप (unit of measurement) |
| सेवानिवृत्त | सेवेतून मुक्त झालेला (retired) |
| स्टूल | लहानसा लाकडी बाक (stool) |

## वाक्प्रचार व त्यांचे अर्थ

| | |
|---|---|
| अल्लाला प्यारी होणे | मृत्यू होणे, मरण पावणे (death) |
| आपलेसे करणे | आपले असल्यासारखे वागवणे (to absorb) |
| इशारत मिळणे | इशारा मिळणे (to give warning, to indicated) |
| कष्टाचे चीज होणे | केलेल्या कष्टाचे फळ प्राप्त होणे |
| कंठ दाटून येणे | भावनेच्या आवेगाने मन भरून येणे |
| गुंतून पडणे | अडकून पडणे (entangle) |
| चौवाटा पांगणे | चार दिशांना विखुरणे (to spread in four directions) |
| जुपी जोडणे | जुळवाजुळव करणे (make a preparation) |
| डोळ्यांत पाणी तरळणे | रडू येणे, डोळे भरून येणे (brim with tears / to cry) |
| दाखल होणे | हजर होणे, उपस्थित होणे (to be present) |
| दिलासा देणे | धीर देणे (to console) |
| ध्यान देऊन ऐकणे | लक्षपूर्वक ऐकणे (to concentrate) |
| धुंडून काढणे | शोधून काढणे (to detect) |
| निका लागणे | लग्न होणे (to get married) |
| निर्धार बांधणे | ठाम निश्चय करणे (to determine) |
| नेट धरणे | धीर धरणे (to not be impatient) |
| नेमणूक करणे | निवड करणे (to appoint) |
| पवित्रा घेणे | तयारीने उभे राहणे (to assume a posture) |
| पायपीट करणे | कामानिमित्त सतत चालणे (to walk continuously) |
| बदलत्या काळाची पावलं ओळखणे | काळाची गरज लक्षात घेणे (need of the hour) |
| मुरतीला घालणे | मुरत ठेवणे (to soak) |
| रुजू होणे | एखाद्या पदावर हजर होणे (to join) |
| लकडं लागणे | तगादा लागणे (to make persistent demand) |
| विलीन होणे | सामावून जाणे (to be merge) |
| हरवलेला काळ मुठीत पकडणे | जुन्या आठवणी पुन्हा जगू पाहणे (seeing old memories live again) |

## टिपा

| | |
|---|---|
| अलिबाबा | काल्पनिक कथेतील एक पात्र ज्याने 'खुलजा सिमसिम' या आवाजाने जादुई गुहेचे दार उघडून सोन्याचा खजिना मिळवला होता. |
| पन्हाळा | महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा गड. |
| बहुरूपी | अनेक रूपे धारण करणारा, हुबेहूब नक्कल करणारा. |
| मृत्युंजयकार | लेखक शिवाजी सावंत. यांच्या 'मृत्युंजय' या अजरामर कलाकृतीच्या नावाने आजही त्यांना ओळखले जाते. |
| लोकशाही | भारतीय शासनपद्धती, ज्यात सर्व अधिकार जनतेच्या हाती असतात. |
| संस्थाने | इंग्रजांच्या राजवटीत काही राजे त्यांची राज्ये इंग्रजांच्या अधिपत्याखाली चालवत होते. अशा राज्यांना संस्थाने असे म्हटले जाते. |

Sample Content

## परिच्छेद १

### कृती १ – आकलन

**१. कृती करा.**

**i.** मामूने पाहिलेली दोन राज्ये

**उत्तर :** १. संस्थानाचे  २. लोकशाहीचे

**ii.** राजाराम महाराजांविषयीच्या जुन्या आठवणी सांगताना मामूच्या चर्येत होणारे बदल

**उत्तर :** १. अभिमानाची झालर पसरते
२. डोळे किलकिले होतात
३. भुवया आक्रसतात

**iii.** मामू शाळेबाहेर करत असलेले उद्योग

**उत्तर :** १. फळांच्या मार्केटमध्ये एखाद्या बागवानाच्या दुकानावर काही वेळ बसून त्याचे दुकान चालवणे
२. एखाद्या मुस्लिम अधिकाऱ्याच्या बच्चाबच्चीला उर्दूची शिकवण देणे

***iv.** मामूची शालाबाह्य रूपे

**उत्तर :** १. मौलवी  २. व्यापारी  ३. उस्ताद

**v.** मामूच्या मुलाच्या लग्नाला आलेले पाहुणे

**उत्तर :** १. आमदार  २. खासदार
३. बडे व्यापारी  ४. शिक्षक
५. प्राध्यापक  ६. मृत्युंजयकार

***vi.** लेखकाने विद्यार्थ्यांचे वर्णन करण्यासाठी वापरलेले शब्दसमूह

**उत्तर :** १. चैतन्याचे (छोटे) कोवळे कोंब
२. अनघड, कोवळे कंठ

**vii.** मामू परिधान करत असलेल्या पोशाखाची वैशिष्ट्ये – फेटा, शर्ट, जाकीट, पॉकिट वॉच, तुमान, पंपशू

**उत्तर :** १. अबोली रंगाचा  २. नेहरू शर्ट
३. गर्द निळा
४. चांदीची साखळी असलेले
५. खाली घेर व घोट्याजवळ चुन्या असलेली
६. जुने पुराणे

**२. चौकटी पूर्ण करा.**

**i.** मामूचा शाळेत कार्यरत असण्याचा काळ

**ii.** मामू या संस्थानात कार्यरत होता

**iii.** यांच्या कैक पिढ्यांचा मामू साक्षीदार होता

**iv.** महाराजांच्या या गडावरील मुक्कामाच्या वेळी मामूला चौदा मैलांची पायपीट करावी लागे

**v.** शाबूने पास केलेली परीक्षा

**उत्तर :** i. चाळीस वर्षे  ii. कोल्हापूर
iii. कोल्हापूरकरांच्या  iv. पन्हाळा
v. एस. एस. सी.

**३. कोण ते लिहा.**

*i. चैतन्याचे छोटे कोंब –
*ii. अनघड, कोवळे कंठ –
*iii. सफेद दाढीतील केसांएवढ्या आठवणी असणारा –
iv. मामूची नेमणूक करणारे संस्थानिक –
*v. शाळेबाहेरचा बहुरूपी –
vi. मामूच्या कर्तबगारीने समाधानी झालेला –
vii. मृत्युंजयकार –
viii. मामूचा शेवटचा बच्चा –

**उत्तर :** i. शाळेतील मुले  ii. शाळेतील मुले
iii. मामू  iv. राजाराम महाराज
v. मामू  vi. लेखक
vii. लेखक (शिवाजी सावंत)
viii. शाबू

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. २ - ३**
**['घण् घण् घण्ऽऽ !............................**
**...................... दाखल केलं.]**

Sample Content

## कृती २ – आकलन

**१. 'अज्ञात शक्तीला' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.**

**उत्तर :** शाळेतील मुले भावपूर्ण सुरात प्रार्थनेतून कोणाला आळवू लागतात ?

**२. चुकीचे विधान शोधा.**

i. मामूच्या मुलांना पैशांचा माज नाही.
ii. मामूची मुले बापाचा शब्द खाली पडू देत नाहीत.
iii. मामूला लेखकाची कर्तबगारी पाहून समाधान वाटले.
iv. मामू पायात जुनापुराणा पंपशू घालतो.

**उत्तर :** मामूला लेखकाची कर्तबगारी पाहून समाधान वाटले.

**३. खालील वाक्यांतून तुम्हांला समजलेले मामूचे गुण लिहा.**

*i. मामू सावधानचा पवित्रा घेऊन खडा होतो. ......
ii. खूप बघितलंय आणि भोगलंय त्यानं......
iii. हयातभर अंगावर पट्टा चढवून शिपाई म्हणून केलेल्या चाकरीचं चीज झाल्याचं समाधान त्याच्या सफेद दाढीभर पसरलेलं होतं.
iv. बदलत्या काळाची पावले ओळखून मामूने निर्धार बांधला.

**उत्तर :** i. राष्ट्रभक्ती, स्वदेशाभिमान
ii. कार्यनिष्ठा, कर्तव्यदक्षता
iii. समाधानी वृत्ती
iv. जागरूक पालकत्व, दूरदृष्टीपणा

**४. खालील शब्दांसाठी पाठात आलेल्या उपमा लिहा.**

i. मामूची सफेदी दाढी ii. मामूचे हात

**उत्तर :** i. चुनेवाणाची ii. अलिबाबाचे हात

**५. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

**i. लेखकाच्या मते मामू कोणत्या गोष्टीचे उत्तम उदाहरण आहे ?**

**उत्तर :** लेखकाच्या मते मामू 'गरीब माणसाने किती आणि कसे हुशार असावे' याचे उत्तम उदाहरण आहे.

**ii. लेखक कोणता विचार घेऊन मंडपातून बाहेर पडला ?**

**उत्तर :** 'धमपिक्षा माणूस मोठा आणि माणसापेक्षा माणुसकी फार फार मोठी आहे' हा विचार घेऊन लेखक मंडपातून बाहेर पडला.

**iii. मामूने लेखकाच्या मागे कशाचा तगादा लावला होता ?**

**उत्तर :** मामूने लेखकाच्या मागे 'शाबूला कोठेतरी नोकरी मिळवून द्या' असा तगादा लावला होता.

**६. कारणे लिहा.**

**i. लग्नासाठी आलेल्या पाहुण्यांचे आभार मानताना मामूचा कंठ दाटून आला ; कारण...**

**उत्तर :** बड्या आसामींनी आपल्या घरी, आपल्या मुलाच्या लग्नसोहळ्यास हजेरी लावणे ही 'मामू' सारख्या सर्वसामान्य कष्टकऱ्यासाठी प्रचंड मोलाची बाब होती.

**ii. लेखकाने मामूला शाबूला पदवीपर्यंत शिकवण्याचा सल्ला दिला ; कारण...**

**उत्तर :** मामूच्या घरात आजतागायत कोणीही पदवीधर झाले नव्हते. शिवाय एस. एस. सी. नंतर लगेचच शाबू नोकरीला लागला असता, तर तो त्यातच गुंतला असता. त्याचे पुढे जाण्याचे सर्व मार्ग खुंटले असते. या साऱ्याचा विचार लेखकाने केला होता.

**७. खालील घटनेचे परिच्छेदाच्या आधारे परिणाम लिहा.**
**संस्थानांचे विलिनीकरण झाले.**

**उत्तर :** इमानी चाकरवर्ग चौवाटा पांगला.

***८. खालील शब्दसमूहाचा अर्थ लिहा.**
**अभिमानाची झालर**

**उत्तर :** संस्थानातील राजाराम महाराजांच्या सेवेत असतानाच्या आठवणींत रमताना मामूच्या चेहऱ्यावर विलक्षण अभिमान झळकू लागतो. हा अभिमान आपल्या राजाप्रति असलेल्या आदरभावाची, त्याच्यातील कर्तव्यनिष्ठतेची, कार्यतत्परतेची, सहनशीलतेची, राष्ट्रप्रेमाची जाणीव करून देतो. ही चमचमणारी अभिमानाची झालर त्याच्या चेहऱ्यावर आजही तसेच तेज पसरवताना दिसते.

## कृती ३ – स्वमत/अभिव्यक्ती

**१. 'गेली चाळीस वर्षे तो आपल्या अलिबाबाच्या हातानं घंटेचे टोल देत, असे चैतन्याचे कोंब नाचवत आलाय' या वाक्याचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.**

**उत्तर :** 'मामू' एका शाळेमध्ये चाळीस वर्षांच्या दीर्घ कालावधीत शिपाई म्हणून कार्यरत आहे. रोज सकाळी शाळेची घंटा वाजवून तो शाळेतील मुलांना शाळा भरल्याचे सूचित करतो. घंटा वाजवताक्षणी चैतन्याने भारलेले, जीविताने फुलू पाहणारे लहानगे कोंब म्हणजेच ही लहानगी मुलं उड्या मारत शाळेत प्रविष्ट होतात. ज्याप्रमाणे अलिबाबा हे काल्पनिक कथेतील पात्र 'खुल जा सिम सिम' म्हणत खजिन्याचे दार उघडते, त्याप्रमाणे मामूदेखील ही घंटा वाजवून चैतन्याने भारलेल्या मुलांकरिता शाळेचे दार उघडे करतो. ज्याप्रमाणे दरवाजा खोलताच अलिबाबाला सोन्याचा खजिना मिळतो त्याप्रमाणे मामूलाही या चैतन्यमयी मुलांच्या रूपात एक प्रकारचा आनंदाचा खजिनाच मिळतो.

Sample Content

**२. परिच्छेदातील वाक्याचा तुम्हांला समजलेला अर्थ स्पष्ट करा.**

**'मामूनं केलेल्या कष्टमय चाकरीचं फळ म्हणून असेल; पण त्याची सगळीच मुलं गुणवान निघालीत.**

**उत्तर :** मामू हा मुळातच कष्टाळू. शाळेत शिपाई म्हणून काम करणारा एक कष्टकरी. या कामाव्यतिरिक्त जे काम समोर येईल ते कोणतीही लाज न बाळगता आनंदाने करणारा व त्याचा जो मोबदला मिळेल तो तितक्याच समाधानी वृत्तीने स्वीकारणारा एक साधा, सरळ माणूस. स्वत:च्या पायावर उभी असलेली त्याची तीन मुले जरी पैसा कमवू लागली असली तरीही त्यांना त्याचा माज नव्हता. हे त्यांच्यावरील संस्कारांमुळेच शक्य झाले. आपल्या वडिलांप्रमाणेच ही मुलेही अहंकाराच्या अधीन झाली नाहीत. आपल्या वडिलांनी आपल्यासाठी केलेल्या कष्टांची त्यांना जाणीव असावी. त्यामुळेच, मामू जे म्हणेल ते अंतिम मानून ते त्याच्या प्रत्येक शब्दाचा मान राखत. त्यांच्या बापाने सांगितलेली प्रत्येक गोष्ट ते मान्य करत. ही गोष्ट मामूने त्याच्या मुलांकरिता केलेल्या कष्टाची, त्यांच्यावरील संस्कारांची जाणीव करून देते. त्याच्या मेहनतीचे फळ म्हणून परमेश्वराने त्याच्या पदरी गुणवान मुले दिली.

***३. 'माणसापेक्षा माणुसकी फार फार मोठी आहे!', या विधानातील आशयसौंदर्य तुमच्या शब्दांत लिहा.**

**उत्तर :** माणुसकी हा मानवाचा मूलधर्म आहे. जर माणसामधून तीच वजा केली, तर उरतो तो इतर प्राण्यांप्रमाणे एक सर्वसामान्य प्राणी. तिच्याशिवाय माणसाचा विचारच अशक्य आहे.

माणसामाणसांमध्ये धर्म, जात, वंश, वर्ण, श्रीमंती, गरिबी अशा अनेक कारणांमुळे मानवानेच भेद निर्माण केले आहेत. या आणि अशा अनेक कारणांच्या भिंती मानवामानवामध्ये बांधलेल्या आहेत. या साऱ्या भेदाभेदांच्या पलीकडे असते ती 'माणुसकी'. या भिंती माणसाला अडवतात; पण त्या माणुसकीला अडवू शकत नाहीत. जगभरातील माणूस परस्परांमधील सारे भेद विसरून एकमेकांशी बांधला जातो तो या माणुसकीच्या बंधानेच. माणुसकी नाही, तर मानव नाही हे वास्तव आहे.

माणूस श्रीमंत आहे, की गरीब; तो मनाने मोठा आहे, की लहान; सुंदर आहे, की कुरूप; हिंदू आहे, की मुस्लिम हे सारे वाद संपवते ती माणुसकी. ती समोरच्या माणसाच्या दु:खाने दु:खी होते, सुखाने सुखावते. म्हणूनच, मला वाटते, की मानवाला मानव म्हणून जगायला शिकवणारी ही 'माणुसकी' मानवापेक्षा लहान असूच शकत नाही.

## परिच्छेद २

### कृती १ – आकलन

**१. आकृतिबंध पूर्ण करा.**

i. **मामू काम करत असलेल्या शाळेची वैशिष्ट्ये** → ☐ ☐ ☐

**उत्तर :** १. शंभर वर्षांपेक्षा अधिक जुनी
२. सरकारी
३. ड्रॉईंग, कॉमर्सच्या सरकारी सर्टिफिकेटच्या परीक्षांचे केंद्र असलेली

ii. ☐ ← **उताऱ्यात आलेले राष्ट्रीय सण** → ☐

**उत्तर :** १. सव्वीस जानेवारी  २. पंधरा ऑगस्ट

iii. ☐ ← **मामूला या गोष्टींचे ज्ञान आहे** → ☐

**उत्तर :** १. उर्दू भाषेचे  २. वैद्यकाचे

iv. **शाळेतील कार्यक्रमाच्या वेळी मामू करत असलेली कामे** → ☐ ☐ ☐ ☐

**उत्तर :** १. कार्यक्रमाची आखणी करणे
२. फ्लॉवरपॉटपासून टेबलक्लॉथपर्यंत सारी व्यवस्था करणे
३. वक्ता काय बोलतो हे लक्षपूर्वक ऐकणे
४. वक्त्याच्या बोलण्यावर आपले मत व्यक्त करणे

**२. चौकटी पूर्ण करा.**

i. **शाळेतल्या कार्यक्रमाची आखणी करणारा** → ☐

ii. **मामूच्या सेवानिवृत्तीकरिता उरलेला कालावधी** → ☐

iii. **मामूने त्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत शाळेत नोकरी करावी असे वाटणारा** → ☐

**उत्तर :** i. मामू  ii. एक वर्ष  iii. लेखक

Sample Content

३. **ओघतक्ता**

**i. पवार सरांना मामूने सुचवलेल्या उपायाचा ओघतक्ता पूर्ण करा.**

**साखरेच्या पाकात तूप घालावे**
↓
१
↓
२
↓
**महिनाभरात तुम्हांला कोणी ओळखणार नाही**

**उत्तर :** १. शेरभर साफ धुतलेल्या खारकांच्या बिया काढून त्या पंधरा दिवस मुरतीला घालाव्यात.
२. रोज सकाळी अनोशा पोटी दोन-दोन खाव्यात.

**ii. लेखकाच्या मामूविषयीच्या इच्छांचा ओघतक्ता पूर्ण करा.**

**लेखकाला वाटते, की मामूने त्याच्या हाताने थोराड घंटेचे टोल देत राहावेत**
↓
१
↓
२
↓
**दगडी खांबाला रेलून ते प्रार्थनाबोल ऐकताना, पार बुढा झालेला मामू विचारांत हरवलेला असावा**

**उत्तर :** १. त्या टोलाच्या तालावर चैतन्याचे अगणित कोवळे कोंब नाचत राहावेत
२. जोडल्या हातांनी आणि मिटल्या डोळ्यांनी, कवळिकीच्या असंख्य अनघड कंठातून प्रार्थनेचे धीरगंभीर बोल असेच उमटत राहावेत

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ३, ४, ५**
**[परवा परवा ............................**
**....................... बघायला मिळावा.]**

## कृती २ – आकलन

*१. **खालील वाक्यांतून तुम्हांला समजलेले मामूचे गुण लिहा.**

i. आईच्या आठवणी सांगताना मामूच्या डोळ्यांत पाणी येते. ......

ii. मामू त्याला आईच्या मायेनं धीर देत म्हणतो, "घाबरू नकोस. ताठ बस. काय झालं न्हाई तुला."......

iii. माझ्याकडं कुणी बडा पाहुणा आला, की मामूकडं बघत नुसती मान डुलवली, की तिचा इशारा पकडत मामू चहाची आर्डर देतो. ......

iv. मामू एखाद्या कार्यक्रमात मुलांच्यासमोर दहा-वीस मिनिटे एखाद्या विषयावर बोलू शकतो. ......

**उत्तर :** i. हळवेपणा, संवेदनशीलता, मातृप्रेम
ii. मायाळूपणा, आपुलकी
iii. कर्तव्यतत्परता, चपळाई
iv. उत्तम वक्तृत्व गुण, हुशारी

२. **खालील शब्दासाठी परिच्छेदात आलेल्या उपमा लिहा.**
मुलांचे कंठ

**उत्तर :** कवळिकीचे, अनघड.

३. **एका वाक्यात उत्तर लिहा.**
**वक्त्यात काही खास नसल्यास मामू नाराजी कशी प्रकट करत असे ?**

**उत्तर :** वक्त्यात काही खास नसल्यास मामू 'बोललं चांगलं ते, पर म्हनावी तशी रंगत न्हाई भरली' असे म्हणून आपली नाराजी प्रकट करत असे.

४. **तक्ता पूर्ण करा.**

| क्र. | आजार | त्यावरील मामूचे सल्ले |
|---|---|---|
| i. | पायाला दुखापत झाली. | ________ |
| ii. | पोट बिघडले. | ________ |

**उत्तर :**

| क्र. | आजार | त्यावरील मामूचे सल्ले |
|---|---|---|
| i. | पायाला दुखापत झाली. | **त्यावर कुठला पाला वाटून लावावा ते सांगे.** |
| ii. | पोट बिघडले. | **त्यावर कुठला काढा प्यावा ते सांगे.** |

५. **कारण लिहा.**

**i. मामू काम करत असलेल्या शाळेतील रेकॉर्ड अवाढव्य आहे; कारण .......**

**उत्तर :** मामू काम करत असलेली शाळा शंभर वर्षांहून अधिक जुनी आहे. त्यामुळेच, येथील रेकॉर्ड अवाढव्य आहे.

**ii. मामूला वर्षभरानंतर शाळा सोडून घरी जावे लागणार होते; कारण .......**

**उत्तर :** वर्षभराने मामू सेवानिवृत्त होणार होता. सरकारी नियमाप्रमाणे त्याला शाळेतून बाहेर पडणे भाग होते.

Sample Content

*६. **खालील शब्दसमूहाचा अर्थ लिहा.**

**थोराड घंटा**

**उत्तर :** प्रस्तुत परिच्छेदात लेखकाने शाळेच्या घंटेला थोराड अशी उपमा दिली आहे; कारण जेवढी मोठी परंपरा शाळेला आहे तेवढीच या घंटेलादेखील आहे. थोराड म्हणजे वयाने मोठी झालेली, आकाराने भव्य असणारी व्यक्ती होय; मात्र मानवाप्रमाणेच या घंटेनेही अनेक वर्षे या शाळेत काढली आहेत. त्यामुळे, ही घंटा वयाने मोठी झालेली आहे. शिवाय, तिचा आकारही भव्य असल्याने 'थोराड' हे मानवाला लागणारे विशेषण येथे चपखल बसते. थोराड माणसांच्या पदरी जशी अनुभवांची, आठवणींची पुंजी असते तशीच अनुभवांची, आठवणींची पुंजी या घंटेकडेही असावी.

## कृती ३ – स्वमत/अभिव्यक्ती

*१. **मामूच्या संवेदनशीलतेची दोन उदाहरणे तुमच्या शब्दांत लिहा.**

**उत्तर :** अनेक वर्षे वाट्याला येणारे प्रत्येक काम खंबीरपणे पार पाडणारा मामू आजही संवेदनशीलतेचा हळवा कोपरा सांभाळून असल्याचे दिसते. ही संवेदनशीलता काही प्रसंगी प्रकर्षाने जाणवते. जेव्हा मामूच्या हृदयाच्या सगळ्यांत जवळ असणारी त्याची आई मृत्यू पावते त्यावेळी नातवंडं असलेला मामू आपल्या लहानग्या शाबूच्या वयाचा होऊन डोळ्यांत पाणी आणतो. मूल कितीही मोठं झालं तरी आईशी ते तितकंच जोडलेलं असतं याचा प्रत्यय मामूच्या बाबतीतही येतो. 'दुनियेत सारं मिळेल सर; पण आईची माया कुणाकडनं न्हाई मिळायची' या त्याच्या वाक्यातून त्याची आईविषयीच्या संवेदनशीलतेची, त्याच्या हळव्या मनाची प्रचीती येते. आईच्या आठवणीत आपल्या वयाचे भान न राखता मामू लहान मुलाप्रमाणे आपल्या वेदना, आपले दु:ख मांडू लागतो.

शाळेत जेव्हा केव्हा लहानगी पोरं खेळाच्या अथवा प्रार्थनेच्या वेळी चक्कर येऊन पडतात त्यावेळी मामू तात्काळ त्यांना रिक्षात घालून डॉक्टरकडे नेतो. केवळं आपलं काम आहे म्हणून ते न करता तो आईच्या मायेने या घाबरलेल्या चिमुकल्यांना धीर देतो. 'घाबरू नकोस. ताठ बस. काय झालं न्हाई.' असे म्हणत तो कावऱ्याबावऱ्या पिल्लांना धीर देतो. त्यांची मायेने काळजी घेतो. यातून मामूमधील संवेदनशीलतेची प्रचीती येते.

२. **परिच्छेदातील खालील वाक्याचा तुम्हांला समजलेला अर्थ स्पष्ट करा.**

**मामू हरवलेल्या काळाला मुठीत पकडण्याचा प्रयत्न करतो.**

**उत्तर :** मामू हा त्याच्या आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तिला माणुसकीच्या बंधाने बांधून ठेवत असे. शाळेत शिपाई म्हणून काम करत असताना कित्येक मुले, शिक्षक त्याला भेटत, त्यांच्या साऱ्यांच्या आठवणी त्याने त्याच्या मनात कायम कैद केल्या आहेत. ज्यावेळी एखादा माजी विद्यार्थी त्याला भेटतो, त्यावेळी या साऱ्या आठवणी भरभरून बाहेर येऊ लागतात. आयुष्यातला सुंदर काळ मामूच्या नजरेसमोर भराभर येऊ लागतो. हा गेलेला काळ, त्यातील घटना, त्यांच्या आठवणी इतक्या सुंदर आहेत, की त्या मुठीत पकडून पुन्हा एकदा जगाव्यात, त्या हातातून निसटून जाऊ नयेत अशा भावना मामूच्या मनात दाटतात. नकळतपणे मामू त्या काळात, त्या आठवणींत रमतो. हा काळ सरू नये यासाठी तो त्याला मुठीत गच्च पकडण्याचा प्रयत्न करतो.

## पाठाधारित कृती

*१. **स्वमत**

i. **'शाळेत तो शिपाई आहे; पण शाळेबाहेर तो बहुरूपी आहे', या मामूसंबंधी केलेल्या विधानाचा अर्थ पाठाधारे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.**

**उत्तर :** 'मामू' हा शाळेत शिपाई म्हणून कार्यरत असलेला एक सर्वसामान्य माणूस; पण आपल्या अंगी असलेल्या बहुगुणांमुळे तो इतरांहून वेगळा ठरतो. मामू ज्या माणसांच्या संपर्कात जातो त्या साऱ्यांचा तो 'मामू' होतो. असा हा 'मामू' शाळेतील आपले काम अगदी मनापासून आणि चोखपणे बजावतो.

मामू जेव्हा शाळेबाहेर पडतो तेव्हा मात्र तो शिपाई राहात नाही. आपल्या मोकळ्या आणि सारे काही सामावून घेण्याच्या वृत्तीमुळे तो जेथे जातो, तिथला होतो. कधी तो बागवानाचे दुकान चालवणारा आणि मोबदल्याची अपेक्षा न करणारा दुकानदार होतो, तर कधी लहानग्यांना उर्दू भाषेचे धडे देणारा शिक्षक होतो. आपल्या घरी तो आपल्या मुलांचा जागरूक, जबाबदार, मुलांच्या भविष्याच्या चिंतेने दूरचा विचार करणारा पिता

Sample Content

असतो, तर कधी आपल्या आईच्या आठवणीत रडणारा, क्षणात आपल्या लहान मुलांच्या वयाचा होणारा मुलगा असतो. वैद्याची भूमिका घेणारा मामू ही भूमिकाही चोख बजावतो.

अशा अनेकविध भूमिकांमधून मामू आपल्यासमोर प्रकट होतो. जणू एखादा बहुरूपी अनेक रूपे घेऊन अगदी परिपूर्ण भूमिका बजावत असतो. प्रचंड उत्साहाने, तेवढ्याच समर्पक वृत्तीने प्रत्येक काम करणारा, भरभरून आयुष्य जगणारा, प्रत्येक भूमिका तितक्याच ताकदीने बजावणारा हा मामू जणू बहुरूपीच असावा असे क्षणभर वाटून जाते.

**ii. मामूच्या व्यक्तित्वाचे (राहणीमान, रूप) चित्रण तुमच्या शब्दांत करा.**

**उत्तर :** 'मामू' म्हटलं, की समोर अवतरतो तो संस्थान व लोकशाही अशी दोन्ही राज्ये पाहिलेला, अनुभवलेला आणि भोगलेला, चुन्याच्या निवळीसारख्या पांढऱ्या दाढीचा उत्साही माणूस. आपल्या दीर्घ अनुभवाची साथ देणारी ही पांढरी दाढी म्हणजे त्याच्या आजवरच्या प्रवासाची साक्षीदार. आपल्या आगळ्यावेगळ्या मात्र नीटनेटक्या पोशाखामुळे वेगळेपणाने उभारून येणारा एक शिपाई म्हणजे मामू. डोक्यावरील अबोली रंगाचा फेटा, अंगात असणारा नेहरू शर्ट व त्यावर गर्द निळ्या रंगाचे जाकीट परिधान करणारा मामू त्याच्या जाकिटाच्या खिशात चांदीच्या साखळीचे एक जुने पॉकेट वॉच ठेवायला कधी विसरत नसे. त्याच्या पेहरावातील हा घटक त्याचा वेगळेपणा उचलून धरताना दिसतो. खाली घेर असलेली आणि घोट्याजवळ चुण्या असलेली तुमान आणि पायात जुनापुराणा पंपशू असा ठरलेला पोशाख मामूचे आगळेवेगळे व्यक्तिमत्त्व आपल्यासमोर उभे करतो. त्याच्या या पेहरावातून त्याचा साधेपणा आणि त्या साधेपणात असलेला वेगळेपणा लक्षात येतो.

मामूच्या पेहरावात जितका साधेपणा होता तितकाच साधेपणा त्याच्या वागण्यातही होता. तो पैशाने श्रीमंत नसला तरी आपल्या मनमिळाऊ स्वभावाने, माणुसकीने त्याने पैशाने आणि मानाने मोठी असलेली अनेक लोकं जोडली होती. धर्म, जात, गरिबी, श्रीमंती अशी कोणतीही भिंत त्याच्या मनात नव्हती. त्यामुळेच, हे सारे भेद कधी त्याच्या मोकळ्या मनाला शिवलेलेही दिसत नाहीत.

'मामू', मामू म्हणजे साधेपणा, प्रामाणिकपणा, देशप्रेम, नम्रपणा, सेवाभावी वृत्ती, दूरदृष्टीपणा, सहृदयता, माणुसकी, जबाबदारपणा, हुशारी, कर्तव्यदक्षता, उत्साह या साऱ्या गुणांचे अजबगजब रसायनच.

***२. अभिव्यक्ती.**

**i. 'मामू' या पाठाची भाषिक वैशिष्ट्ये स्पष्ट करा.**

**उत्तर :** 'मामू' या पाठात लेखक शिवाजी सावंत यांनी साधी, सरळ, सोपी भाषा वापरली आहे. विविध रूपके, ओघवती भाषाशैली, संवादात्मक भाषेचा वापर, समर्पक प्रतीकांचा उपयोग यांमुळे पाठ अधिक वाचनीय झाला आहे. 'चैतन्याचे छोटे कोंब', 'अनघड कोवळे कंठ' अशी रूपके वापरून लेखकाने या पाठाला भाषिक वैभवाने समृद्ध केले आहे. मराठी, उर्दू, हिंदी आणि इंग्रजी अशा चारही भाषांचा उत्तम संयोग या पाठात झालेला दिसून येतो. लेखक शिवाजी सावंत यांनी निरनिराळ्या गोष्टींना दिलेल्या उपमा भाषासमृद्धीची जाणीव करून देतात. उदा. मामूची सफेद दाढी चुनेवाणाची होती. 'मामू' या पाठात मामूच्या हातांना दिलेली अलिबाबाच्या हाताची उपमा म्हणजे लेखकाने साधलेला कल्पकतेचा भाषिक आविष्कारच म्हणावा लागेल. घंटेला लावलेले 'थोराड' हे विशेषण त्या निर्जीव घंटेवर मनुष्यपणाचा आरोप करताना दिसते. यामुळे, त्या घंटेच्या बाबतीतील तिचा भव्यपणा, तिचे जुनेपण एका शब्दात अधोरेखित होते. 'बदलत्या काळाची पावलं ओळखतो' सारख्या वाक्यात काळावर मानवी कृतींचा आरोप केलेला दिसतो. येथे चेतनगुणोक्ती अलंकार साधला गेल्याने हे वाक्य अधिक बोलके झाल्याचे दिसून येते. पाठात 'इशारत मिळणे', 'पवित्रा घेणे', 'चौवाटा पांगणे' इत्यादी वाक्प्रचारांच्या चपखल वापरामुळे भाषासौंदर्यात भरच पडली आहे.

शब्दशक्तींच्या उत्तम वापराने हा पाठ समृद्ध झाला आहे. 'शब्द खाली पडत नाही' अशा वाक्यांमधून लेखकाने लक्ष्यार्थ साधलेला दिसतो.

प्रस्तुत पाठात वीर रस, करुण रस, शांत रस यांची प्रचीती येते. या रसांच्या सुरेख संयोगातून हा पाठ आशयघन होऊन वाचकांपुढे प्रकट होतो. अशारीतीने, 'मामू' हा पाठ म्हणजे भाषासौंदर्याचा उत्तम नमुनाच म्हणावा लागेल.

Sample Content

**ii. मामूच्या स्वभावातील विविध पैलूंचे विश्लेषण करा.**

**उत्तर :** 'मामू' या सर्वसामान्यांतील असामान्य माणसाविषयी लिहिताना लेखक शिवाजी सावंत यांनी मामूच्या स्वभावातील अनेक पैलू उलगडून दाखवले आहेत. मामूच्या व्यक्तिमत्त्वाला प्रेमळपणा, मायाळूपणा, संवेदनशीलता, देशप्रेम, स्वामीनिष्ठा, जबाबदारपणा, समाधानी वृत्ती, माणुसकी, धर्मसहिष्णुता, दुसऱ्याला मदत करण्याची, आधार देण्याची वृत्ती, दूरदृष्टीपणा, चिकाटी असे अनेक आयाम दिसतात.

मामूचा स्वभाव मुळातच प्रेमळ, मायाळू आहे. त्याचा जीव त्याच्या शाळेतील मुलांमध्ये वसतो. मुलांमधील चैतन्य पाहून त्याला समाधान मिळते. देशप्रेम हे मामूच्या नसानसांत भिनल्याचे दिसून येते. राष्ट्रगीताचा सन्मान, ध्वजवंदनेची त्याची पद्धत यांवरून त्याच्यातील देशप्रेमाची झलक दिसून येते. संस्थानिकांच्या काळात प्रचंड शारीरिक श्रम कोणत्याही तक्रारीविना करताना पाहून त्याच्यातील स्वामिनिष्ठता, कर्तव्यनिष्ठा आपणांस लक्षात येते. कोणत्याही प्रकारचा कमीपणा न मानता समोर दिसेल ते काम कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न करता करणे यातून त्याच्यातील कष्टाळूपणा व समाधानी वृत्तीचे दर्शन घडते. मामू जेवढा उत्साही, कष्टकरी आहे तेवढाच तो स्थितप्रज्ञ आणि जबाबदारही आहे. आपल्या मुलांवरील संस्कार, त्यांच्या शिक्षणाप्रति असलेली जागरूकता, त्यांच्या भविष्याचा वेध घेणारी दूरदृष्टी यांवरून त्याच्यातील जबाबदार बापाची ओळख होते. शाळेतील आजारी असणाऱ्या लहानग्या मुलांना 'मामू' आई बनून माया देतो, मुलं घाबरलेली असताना त्यांना धिराने घ्यायला शिकवतो. त्याच्यातील ममता येथे प्रतीत होते; मात्र मुलांना ताठपणे उभे राहायला शिकवणारा कणखर 'मामू' आईच्या आठवणींमुळे अगदी लहान मूल होऊन रडू लागतो. यावरून त्याच्यातील संवेदनशीलतेची जाणीव होते. मामू धर्मापेक्षा माणुसकी जपणारी, माणुसकीला सन्मान देणारी व्यक्ती असल्याने त्याने अनेक माणसं स्वत:भोवती जोडली आहेत. मामूकडे असलेले ज्ञान, मग ते उर्दू भाषेचे असो, वैद्यकीचे असो वा शाळेतील कोणत्याही विषयाचे असो, तो सातत्याने ते वाटत राहतो. इतरांना समृद्ध करत राहतो. असा हा मामू आपल्या या आगळ्यावेगळ्या स्वभाववैशिष्ट्यांमुळे साऱ्यांच्याच मनावर राज्य करतो.

## व्याकरण

***१. खालील शब्दांचे दिलेल्या तक्त्यामध्ये वर्गीकरण करा.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| i. | अनुमती | ii. | जुनापुराणा | iii. | साथीदार |
| iv. | घटकाभर | v. | भरदिवसा | vi. | ओबडधोबड |
| vii. | नानातऱ्हा | viii. | गुणवान | ix. | अगणित |
| x. | अभिवाचन | | | | |

**उत्तर :**

| उपसर्गघटित | प्रत्ययघटित | अभ्यस्त |
|---|---|---|
| अनुमती | साथीदार | जुनापुराणा |
| भरदिवसा | घटकाभर | ओबडधोबड |
| अगणित | गुणवान | |
| अभिवाचन | | |
| नानातऱ्हा | | |

**२. 'पड' हे उपसर्ग असलेले कोणतेही चार शब्द लिहा.**

**उत्तर :** पडसाद, पडताळा, पडजीभ, पडछाया, पडनाव.


**३. खालील वाक्यातील लक्ष्यार्थ लिहा.**

**बापाचा शब्द कधी खाली पडत नाही.**

अ. बापाचा शब्द प्रमाण मानला जातो.
ब. बापाच्या शब्दाला मान नसतो.
क. बापाचा शब्द ऐकलाच जात नाही.

**उत्तर :** बापाचा शब्द प्रमाण मानला जातो.

**४. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर :** १. प्रसाद गुण
२. अंत:करणाला उद्दीपित करणारा, वीर व रौद्र रसांना पुष्टिकारक गुण
३. माधुर्य गुण

**५. खालील वाक्यांचे प्रकार ओळखा.**
**(केवल वाक्य/ मिश्र वाक्य/ संयुक्त वाक्य)**

i. तो बारावीत पास झाला; पण त्याला कमी गुण मिळाले.
ii. कार्यक्रमाकरिता मुख्यमंत्री उपस्थित होते.

**उत्तर :** i. संयुक्त वाक्य ii. केवल वाक्य

Sample Content

**६. खालील वाक्यांतील काळ ओळखून त्याचा प्रकार लिहा.**

i. तो आता त्याचे आयुष्य महत् प्रयासाने कंठत असतो.

ii. आणखी दहा वर्षांनी येथे झाडे दिसतील.

**उत्तर :** i. रीति वर्तमानकाळ ii. साधा भविष्यकाळ

**७. खालील शब्दांतील उच्चार साधर्म्यावरून कृती करा.**

| क्र. | शब्द | अर्थ | वाक्यांत उपयोग |
|---|---|---|---|
| i. | अंक | | |
| | अंक | | |
| ii. | नाद | | |
| | नाद | | |

**उत्तर :**

| क्र. | शब्द | अर्थ | वाक्यांत उपयोग |
|---|---|---|---|
| i. | अंक | **आकडा, संख्या** | **गणित सोडवण्याकरिता गुरुजींनी फळ्यावर अंक लिहिले.** |
| | अंक | **नाटकाचा एक भाग** | **पहिल्या अंकातच नटसम्राटाची भूमिका मनावर छाप पाडून गेली.** |
| | अंक | **मांडी** | **पृथ्वीच्या अंकावर वनराई विसावली होती.** |
| | अंक | **आवृत्ती** | **मी गृहशोभिका मासिकाचा अंक वाचत होते.** |
| ii. | नाद | **छंद** | **निरनिराळे दगड गोळा करण्याचा त्याला नाद लागला होता.** |
| | नाद | **आवाज** | **मंदिरात घंटेचा नाद घुमत होता.** |

**८. अधोरेखित शब्दांचे समानार्थी शब्द लिहून वाक्ये पुन्हा लिहा.**

i. समाधानी चर्येने मामू स्टुलावरून खाली उतरतो.

ii. संस्थानं विलीन झाली आणि असा इमानी चाकरवर्ग चौवाटा पांगला.

iii. मामूच्या जाकिटाच्या खिशात चांदीच्या साखळीचं एक जुनं पॉकेट वॉच होतं.

iv. गरीब माणसानं किती आणि कसं हुशार असावं याचा मामू एवढा मासला मला काही बघायला मिळालेला नाही.

v. पैसा कमावतात म्हणून माज नाही.

**उत्तर :**

i. **तृप्त** चर्येने मामू स्टुलावरून खाली उतरतो.

ii. संस्थानं विलीन झाली आणि असा **प्रामाणिक** चाकरवर्ग चौवाटा पांगला.

iii. मामूच्या जाकिटाच्या खिशात **रुप्याच्या** साखळीचं एक जुनं पॉकेट वॉच होतं.

iv. गरीब माणसानं किती आणि कसं हुशार असावं **याचे** मामू **एवढे उदाहरण** मला काही बघायला **मिळालेले** नाही.

v. पैसा कमावतात म्हणून **गर्व** नाही.

**९. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

i. फेटा ii. पाहुणा iii. इशारा

iv. चण v. पोट vi. पाय

**उत्तर :** i. पागोटे ii. अतिथी iii. खूण

iv. अंगकाठी v. उदर vi. पद

**१०. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

i. समाधानी × ii. कोवळे ×

iii. अज्ञात × iv. सावधान ×

v. इमानी × vi. नाकारणे ×

vii. सरकारी × viii. माथा ×

**उत्तर :** i. असमाधानी ii. जून

iii. ज्ञात iv. विश्राम

v. बेइमानी vi. स्वीकारणे

vii. खाजगी viii. पायथा

**११. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहून अर्थबदल न करता वाक्ये पुन्हा लिहा.**

i. मामूची सगळीच मुलं गुणवान निघालीत.

ii. पैसा कमवतात म्हणून त्यांना माज नाही.

**उत्तर :**

i. मामूचे कोणतेही मूल **दुर्गुणी** निघाले नाही.

ii. पैसा कमवतात **तरीही ते निगर्वी आहेत.**

**१२. खालील शब्दांतील अक्षरे निवडून अर्थपूर्ण शब्द तयार करा.**

i. गृहप्रवेश *ii. आमदारसाहेब

*iii. समाधान iv. पाखरागत

*v. इशारतीबरहुकूम

**उत्तर :**

i. गृह, प्रवेश, वेश, शह.

ii. आमदार, आरसा, आहेर, आब, मदार, मर, दाम, दार, दाब, साम, सार, साहेब, हेम, हेर, बदाम.

iii. समा, सन, मास, मान, मानस, धान, नस, समान.

Sample Content

iv. पारा, पात, खरा, खग, खत, खतरा, राख, राग, रात, गरा, गत, तग.

v. इशारती, रती, रवर, तीर, हुशार, हुकूम, मती, मर.

**१३. खालील शब्दांची सामान्यरूपे लिहा.**

i. जाकिटाच्या ii. शाळेबाहेर

iii. घोट्याजवळ iv. लोकांना

**उत्तर :** i. जाकिटा ii. शाळे

iii. घोट्या iv. लोकां

**१४. रिकाम्या जागी कंसातील शब्दाला योग्य विभक्ती प्रत्यय लिहून वाक्ये पुन्हा लिहा.**

i. एका _______ (मित्र) घेऊन शादीच्या मंडपात गेलो.

ii. मामूचा _______ (शेवट) बच्चा शाबू माझ्या हाताखाली शिकला.

iii. याला _______ (नोकरी) अडकवलात, की हा संपला.

**उत्तर :** i. मित्राला ii. शेवटचा

iii. नोकरीत

**१५. विशेष्य व विशेषण यांच्या योग्य जोड्या जुळवा.**

| क्र. | विशेषण | | विशेष्य |
|---|---|---|---|
| i. | चांदीची | अ. | जाकीट |
| ii. | जुनापुराणा | ब. | मुलं |
| iii. | गुणवान | क. | साखळी |
| iv. | सुटसुटीत | ड. | पंपशू |
| v. | निळं | इ. | नाव |

**उत्तर :** (i - क), (ii - ड), (iii - ब), (iv - ई), (v - अ)

**१६. खालील वाक्यांतील क्रियापदे सकर्मक, की अकर्मक ते ओळखून लिहा.**

i. माझ्याकडे कुणी बडा पाहुणा आला.

ii. मामूकडं बघत नुसती मान डुलवली.

**उत्तर :** i. अकर्मक क्रियापद ii. सकर्मक क्रियापद

**१७. खालील शब्दसमूहांबद्दल एक शब्द लिहा.**

i. अत्यंत कमी आयुष्य असणारा

ii. सर्व इच्छा पूर्ण करणारा वृक्ष

iii. मुस्लिम रितींनुसार होणारे लग्न

iv. आयते बसून खाणारा

**उत्तर :** i. अल्पायुषी ii. कल्पवृक्ष

iii. निका iv. ऐतखाऊ

**१८. गटात न बसणारा शब्द ओळखा व त्यामागील कारणे लिहा.**

i. शंभर, हुशार, इमानी, समाधानी.

ii. पण, अरेच्चा!, आणि, परंतु.

**उत्तर :**

i. शंभर : कारण 'शंभर' हे संख्याविशेषण असून इतर सर्व गुणविशेषणे आहेत.

ii. अरेच्चा! : कारण 'अरेच्चा!' हे केवलप्रयोगी अव्यय असून इतर सर्व उभयान्वयी अव्यये आहेत.

**१९. खालील शब्दांसाठी पारिभाषिक शब्द लिहा.**

i. X-Ray

ii. Recommendation

iii. Runway

iv. Qualified

v. Quorum

vi. Validity

**उत्तर :** i. क्ष-किरण ii. शिफारस

iii. धावपट्टी iv. अर्हतापात्र

v. गणसंख्या vi. वैधता

**२०. खालील शब्दांमधील अचूक शब्द ओळखा.**

i. कारकिर्द, कारर्किद, कारर्कीद, कारकीर्द.

ii. ऊर्दू, उर्दू, ऊर्दु, उर्दु.

**उत्तर :** i. कारकीर्द ii. उर्दू

**२१. खालील वाक्यांत योग्य ठिकाणी विरामचिन्हे घालून वाक्य पुन्हा लिहा.**

i. मामूच्या मुलाचं शादी मुबारक निघालं

ii. शाळेत तो शिपाई आहे पण शाळेबाहेर तो बहुरूपी आहे

iii. घण् घण् घण् थोराड घंटेचे टोलांवर टोल पडत राहतात

**उत्तर :**

i. मामूच्या मुलाचं 'शादी मुबारक' निघालं.

ii. शाळेत तो शिपाई आहे ; पण शाळेबाहेर तो बहुरूपी आहे.

iii. 'घण् घण् घण्ऽऽ!' थोराड घंटेचे टोलांवर टोल पडत राहतात.

**२२. खालील वाक्प्रचारांचा अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा.**

*i. चौवाटा पांगणे *ii. कंठ दाटून येणे

*iii. हरवलेला काळ मुठीत पकडणे

iv. गुंतून पडणे

v. इशारत मिळणे vi. पवित्रा घेणे

vii. पायपीट करणे viii. विलीन होणे

ix. निर्धार बांधणे

**उत्तर :**

**i. चौवाटा पांगणे** – चार दिशांना विखुरणे

**वाक्य :** महाविद्यालयात असताना नेहमी एकत्र राहणारे ते मित्र महाविद्यालयीन वर्षे संपताच **चौवाटा पांगले.**

Sample Content

**ii. कंठ दाटून येणे** – भावनेच्या आवेगाने मन भरून येणे

**वाक्य :** आपल्या खास मित्राच्या आठवणी सांगताना विराजचा **कंठ दाटून आला.**

**iii. हरवलेला काळ मुठीत पकडणे** – जुन्या आठवणी पुन्हा जगू पाहणे

**वाक्य :** सेवानिवृत्तीच्या दिवशी आपटे काका आपल्या टेबलवर बसून **हरवलेला काळ मुठीत पकडण्याचा** प्रयत्न करत होते.

**iv. गुंतून पडणे** – अडकून पडणे

**वाक्य :** विजया कसल्याशा खोल विचारात **गुंतून पडली** होती.

**v. इशारत मिळणे** – इशारा मिळणे

**वाक्य :** शिक्षकांची **इशारत मिळताच** सारे मैदानाकडे धावले.

**vi. पवित्रा घेणे** – तयारीने उभे राहणे

**वाक्य :** रस्त्यामध्ये त्या दोन बैलांनी लढण्याचा **पवित्रा घेतला.**

**vii. पायपीट करणे** – सतत चालणे

**वाक्य :** राघवला वाढदिवसानिमित्त त्याच्या आवडीची भेटवस्तू घेण्यासाठी सर्व मित्रांनी प्रचंड **पायपीट केली.**

**viii. विलीन होणे** – सामावून जाणे

**वाक्य :** भक्तिच्या मार्गाने भक्त परमेश्वरचरणी **विलीन होतो.**

**ix. निर्धार बांधणे** – ठाम निश्चय करणे

**वाक्य :** यंदा परीक्षेत चांगले गुण मिळवण्याचा अजितने मनाशी **निर्धार बांधला.**

**२३. खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांच्या जागी कंसातील योग्य वाक्प्रचार वापरून वाक्ये पुन्हा लिहा. (रुजू होणे, आपलेसे करणे, नेट धरणे, अल्लाला प्यारे होणे, दिलासा देणे, कष्टाचे चीज होणे, लकडं लावणे)**

i. राणे कुटुंबाने परागला आपले असल्यासारखे वागवले.
ii. राजेश तहसीलदार पदावर हजर झाला.
iii. नोकरी लागल्याने किरणचे कष्ट सार्थकी लागले.
iv. मनीषने सकाळपासून आईकडे नव्या कपड्यांसाठी तगादा लावला होता.
v. आई तिच्या मुलांना धीर धरायला शिकवते.
vi. घाबरलेल्या अनिशला बाबांनी धीर दिला.
vii. अकबरची बहीण मृत्यू पावली.

**उत्तर :**

i. राणे कुटुंबाने परागला **आपलेसे केले.**
ii. राजेश तहसीलदार पदावर **रुजू झाला.**
iii. नोकरी लागल्याने किरणच्या **कष्टाचे चीज झाले होते.**
iv. मनीषने सकाळपासून आईकडे नव्या कपड्यांसाठी **लकडं लावलं होतं.**
v. आई तिच्या मुलांना **नेट धरायला** शिकवते.
vi. घाबरलेल्या अनिशला बाबांनी **दिलासा दिला.**
vii. अकबरची बहीण **अल्लाला प्यारी झाली.**

**२४. खालील वाक्प्रचार व त्यांच्या अर्थाच्या योग्य जोड्या जुळवा.**

| क्र. | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| i. | डोळ्यांत पाणी तरळणे | अ. | काळाची गरज लक्षात घेणे |
| ii. | धुंडून काढणे | ब. | लग्न होणे |
| iii. | दाखल होणे | क. | मुरत ठेवणे |
| iv. | ध्यान देऊन ऐकणे | ड. | लक्षपूर्वक ऐकणे |
| v. | मुरतीला घालणे | इ. | हजर होणे |
| vi. | निका लागणे | फ. | शोधून काढणे |
| vii. | बदलत्या काळाची पावलं ओळखणे | ग. | रडू येणे, डोळे भरून येणे |

**उत्तर :** (i – ग), (ii – फ), (iii – इ), (iv – ड), (v – क), (vi – ब), (vii – अ)

**२५. खालील म्हणी पूर्ण करा.**

i. जित्याची खोड _______
ii. चोर सोडून _______

**उत्तर :** i. जित्याची खोड **मेल्याशिवाय जात नाही.**
ii. चोर सोडून **संन्याशाला फाशी.**

**२६. खालील शब्द अकारविल्ह्यांनुसार लावा.**

i. विनय, विनम्र, विजय, विराट.
ii. अवलक्षण, आरक्षण, अवकळा, अजस्र.

**उत्तर :** i. विजय, विनम्र, विनय, विराट.
ii. अजस्र, अवकळा, अवलक्षण, आरक्षण.

## उपक्रम/प्रकल्प

***१. तुमच्या परिसरातील 'मामू' सारख्या बहुगुणी व्यक्तीचा शोध घ्या. त्याच्या व्यक्तिविशेषाचे वर्णन तुमच्या शब्दांत करा.**

[**टीप :** विद्यार्थ्यांनी त्यांच्या परिचयातील एखाद्या बहुगुणी व्यक्तिचा शोध घेऊन त्याच्यातील व्यक्तिविशेषांचे वर्णन स्वत: करणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन म्हणून खाली काही मुद्दे दिले आहेत.]

- व्यक्तिचे नाव
- स्वभावविशेष
- आजवरची वाटचाल
- गुणांचा परिचय घडवणारे काही प्रसंग
- समाजातील स्थान
- विचार
- व्यक्तिमत्त्वातील वेगळेपणा

Sample Content

## AVAILABLE NOTES FOR STD. XI & XII:

### SCIENCE

**Perfect Series:**

For students who want to excel in board exams and simultaneously study for entrance exams.

- Physics Vol. I
- Physics Vol. II
- Chemistry Vol. I
- Chemistry Vol. II
- Mathematics & Statistics Part - I
- Mathematics & Statistics Part - II
- Biology Vol. I
- Biology Vol. II

**Precise Series:**

For students who want to excel in board exams.

- Physics
- Chemistry
- Biology

### COMMERCE (ENG. & MAR. MED.)

**Smart Notes & Precise Notes:**

- Book-Keeping and Accountancy
- Book Keeping and Accountancy (Practice)
- Book-Keeping & Accountancy Solutions To Textbook Problems
- Economics
- Organisation of Commerce and Management
- Secretarial Practice
- Mathematics and Statistics - I
- Mathematics and Statistics - II

### ARTS (ENG. & MAR. MED.)

- History
- Geography
- Political Science
- Psychology
- Sociology

Books available for MHT-CET, NEET & JEE

**Additional Books for Std. XII Sci. & Com.:**

- A collection of Board Questions with solutions (PCMB)
- Solution to HSC Board Question Bank (Science)
- Solution to HSC Board Question Bank (Commerce)
- Supplementary Questions (BK • Eco • OCM • SP)
- HSC 30 Question Papers & Activity Sheets With Solutions (Commerce)
- HSC 25 Question Papers & Activity Sheets With Solutions (Science)
- Marathi Yuvakbharati Model Question Paper Set With Solutions
- Hindi Yuvakbharati Model Question Paper Set With Solutions
- Basic Concept of Physics Simplified

**Languages:**

- English Yuvakbharati
- Hindi Yuvakbharati
- Marathi Yuvakbharati




Scan the QR code to buy e-book version of Target's Notes on Quill - The Padhai App


**OUR PRODUCT RANGE**

Children Books | School Section | Junior College
Degree College | Entrance Exams | Stationery

Visit Our Website

Published by:

Target Publications® Pvt. Ltd.
Transforming lives through learning




Explore our range of STD. XI Sci. Books

B2, 9th Floor, Ashar, Road No. 16/Z, Wagle Industrial Estate, Thane (W)-400604 | 88799 39712 / 14 | 88799 39713 / 15

www.targetpublications.org mail@targetpublications.org